# सहाय्यक आयुक्त समाज कल्याण नांदेड यांचे कार्यालय.

**(सन २०१९-२०)**

**अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनि ट्रॅक्टर व त्याची उपसाधने मिळणेसाठी अर्जाचा नमुना.**

| अ.क्र. | विवरण | |
|---|---|---|
| १ | अर्जदार स्वयंसहाय्यत बचत गटाचे नाव | ` |
| २ | स्थापना दिनांक :- | |
| ३ | स्वयंसहाय्यता बचत गटाचा पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता. | |
| ४ | अध्यक्षाचे नाव –<br>पत्ता –<br>मोबाईल क्र. - | |
| ५ | उपाध्यशाचे नाव –<br>पत्ता –<br>मोबाईल क्र. - | |
| ६ | सचिवाचे नाव –<br>पत्ता –<br>मोबाईल क्र. - | |
| ७ | सदस्य संख्या.<br>अनुसूचित जातीचे सदस्य.<br>इतर जातींची सदस्य संख्या.<br>अनुसूचित जातींचे सदस्य यांची टक्केवारी. | एकूण -----------------------<br>एकूण -----------------------<br>एकूण -----------------------<br>एकूण ----------------------- |
| ८ | स्वयंसहाय्यता बचत गटांचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते आहे काय? | |
| ९ | बँकेचे नाव- | |
| १० | खाते क्रमांक. | \| \| \| \| \| \| \| \| \| \| \| \| \| |
| ११ | IFSC CODE. | |
| १२ | अर्जदार स्वयंसहाय्यता बचत गट मिनि ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांच्या खरेदीच्या कमाल मर्यादा रु. ३.५० लक्ष रक्कमेच्या १०% स्वहिस्सा भरणे बाबतचा तपशील. | |

| अ.क्र. | विवरण | |
|---|---|---|
| १३ | बचत गट कार्यान्वित आहे काय? बचत गटामार्फत राबविण्यात आलेल्या उपक्रमांविषयी थोडक्यात माहिती द्या. | |
| १४ | इतर माहिती. | |

**<u>योजनेच्या अटी व शर्थी खालील प्रमाणे आहेत.</u>**

१) अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचा नोंदणीकृत बचत गट असावा. बचत गटाचे खाते राष्टीयकृत बँकेच्या शाखेतच असावेत.

२) बचत गटामध्ये किमान १० सदस्य असावेत, त्यापैकी ८०% सदस्य हे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील असावेत. अध्यक्ष व सचिव हे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतीलच असावेत.

३) बचत गटातील सदस्य हे महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत.

४) गटातील सदस्यांचे जातीचे व रहिवासी प्रमाणपत्र सक्षम अधिकारी यांनी दिलेले असावेत.

५) बचत गटाचे खाते हे बचत गटाच्या नावाने राष्ट्रीयकृत बँकेत असावेत व अध्यक्ष व सचिव यांचे आधार त्या खात्याशी सलग्न केलेले असावेत.

६) बचत गटाने व गटातील सर्व सदस्यांनी यापूर्वी या योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

७) मिनि ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांची कमाल मर्यादा ही रक्कम रु. ३.५० लक्ष इतकी राहील, बचत गटांनी या रक्कमेचे किंवा त्यापेक्षा जास्त रक्कमेचे मिनि ट्रॅक्टर व त्याची उपसाधने खरेदी केल्यांनतर खरेदीचे मूळ दस्तायेवाज व **RTO** कार्यालयाचे नोंदणी पुस्तक या कार्यालयास प्राप्त झाल्या नंतरच रक्कम रु. ३.१५ लक्ष शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील.

८) पात्र अर्जाची संख्या प्राप्त उद्दिष्ठापेक्षा जास्त असल्यास निवडप्रक्रिया ड्रा पद्धतीने करण्यात येईल.

९) बचत गटातील किमान एका सदस्याकडे वाहन चालविण्याचा परवाना किंवा तसे प्रशिक्षण घेतल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र असावे.

१०) बचत गटांना किमान ९ ते १८ अश्वशक्तीचा किंवा त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीचा मिनि ट्रॅक्टर व त्याची उपसाधने खरेदी करता येतिल, परंतु बचत गटांना रक्कम रु. ३.१५ लक्ष एवढेच शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील, जास्तीची रक्कम बचत गटाने स्वतः भरावी.

११) प्रस्ताव परिपूर्ण सादर करण्याची जबाबदारी अध्यक्ष व सचिवांची राहील.

दिनांक :-
स्थळ :-

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | **उपाध्यक्ष** | **सचिव** |
| (स्वाक्षरी) | (स्वाक्षरी) | (स्वाक्षरी) |

**<u>अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे.</u>**

१) बचत गट किमान १०% रक्कम ( ३५०००/-) भरावयास तयार आहे असे हमीपत्र रु. १०० च्या बॉड पेपरवर.

२) बचत गटातील सदस्यांची बँकेने प्रमाणित केलेली यादी ( नाव, जात, पत्ता व फोटोसह. ) सादर करावी.

३) हमीपत्र रु. १००/- च्या बॉड पेपरवर सर्व सदस्यांच्या स्वाक्षरीने स्वतंत्र सादर केलेले असावे.

४) बचत गटातील सर्व सदस्यांचे रहिवासी प्रमाणपत्र हे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले असावे.

५) गटाचे अध्यक्ष, सचिव व इतर सर्व सदस्य यांचे आधारकार्ड व सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले जातीचे प्रमाणपत्र जोडावे.

६) बचत गटाचे बँक पासबुकची झेरॉक्स सुस्पष्ट खाते क्रमांक व IFSC CODE सह साक्षांकित केलेली असावी.

७) अध्यक्ष व सचिव यांचे आधारकार्ड हे बचत गटाच्या खात्यासी सलग्न केलेले आहे असे बँकेचे प्रमाणपत्र जोडावे.

८) बचत गटातील एका सदस्याकडे वाहन चालविण्याचा परवाना किंवा तसे प्रशिक्षण घेतलेले सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडावे.